**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**


# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)


**(०२३५८) २८२३८७**



**अंक ६६/२०१९** **दिनांक १६/०८/२०१९** **कालावधी ५ दिवस**



| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १०/०८/२०१९ ते १६/०८/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १७/०८/२०१९ सकाळी ८:३० पासून २१/०८/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१०/०८** | **११/०८** | **१२/०८** | **१३/०८** | **१४/०८** | **१५/०८** | **१६/०८** | | **१७/०८** | **१८/०८** | **१९/०८** | **२०/०८** | **२१/०८** |
| ३.६ | ०.० | १२.० | ०.० | ४.० | ५.० | ९.० | **पाऊस (मिमी)** | २७ | ९ | २५ | १० | ५ |
| २८.६ | २८.८ | २९.८ | ३०.४ | ३०.४ | ३०.० | २९.८ | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३१ |
| २६.० | २६.० | २५.८ | २६.२ | २५.८ | २५.८ | २५.६ | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २६ | २५ |
| २ | १ | २ | ० | ० | २ | २ | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ६ | ५ | ८ | ४ | ३ |
| ८५ | ८० | ९२ | ८६ | ९२ | ८७ | ९० | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ८५ | ८४ | ८३ | ८३ | ८२ |
| ८२ | ८५ | ८० | ८१ | ८८ | ८५ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७७ | ७२ | ७२ | ६९ | ६९ |
| १२.८ | १३.६ | ६.७ | ४.० | ३.२ | ४.१ | ५.६ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | २५.५ | २५.२ | २०.३ | १३.६ | १३.४ |
| इ. | इ.पु. | इ.पु. | इ.पु. | शांत | आ.पु. | पु. | **वाऱ्याची दिशा** | नै. | नै.द. | प. | **प.** | नै.प. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| **३३.६** | **२७५५.८** | **२३५९.६** |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १७ ते २१ ऑगस्ट २०१९ पर्यंत हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून वाऱ्याचा वेगात वाढ संभवते.**

**दिनांक १६ ते २२ ऑगस्ट, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्य राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **फुटवे अवस्था** | • पुढील पाच दिवस ढगाळ वातावरण असून पाउसाची उघडीप असण्याची शक्यता असल्यामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरे व सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे सातत्याने निरीक्षण करून किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष ठेवावे. खाचरातील पाणी जास्त काळ न साठवता २-३ दिवसांच्या अंतराने जुने पाणी बाहेर काढण्याची आणि नवीन पाणी खाचरात घेण्याची व्यवस्था करावी. पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही  मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे तसेच सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी शेतात पाणी बांधून पिकावरून एक जाड दोर आडवा धरून ओढत न्यावा त्यामुळे सुरळ्या पाण्यात पडतील. नंतर एक ते दोन तासांनी शेतातील पाणी एका बाजूला फोडून लावावे व सर्व सुरळ्या एका ठिकाणी जमा झाल्यावर नष्ट कराव्यात व त्यानंतर शेतात नवीन पाण्याची साठवण करण्याची व्यवस्था करावी.<br>• भात पिक पुर्नलागवडीनंतर एक महिन्याने गरजेनुसार बेणणी आणि खुरपणी करून भात पिकास फुटवे येण्याच्या अवस्थेत नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात देण्यात यावा.<br>• पर्जन्यमान कमी असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी.पर्यंत ठेवावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • १० वर्षावरील "हापूस" जातीच्या आंबा झाडास नियमित व लवकर फळे धरण्यासाठी कलमांच्या वाढीच्या विस्तारानुसार पॅक्लोब्युट्राझोल (कल्टार) हया वाढ निरोधक संजीवकाची आळवणी पूर्ण करून घ्यावी. |
| **नारळ** | **वाढीची अवस्था** | • नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना मातीची भर द्यावी तसेच बाग तणमुक्त ठेवावी.<br>• नवीन लागवड केलेल्या रोपांवर कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी.<br>• जुन्या नारळ बागेत सुकलेल्या झावळ्या, वांझ पोयी, पालापाचोळा गोळा करून बागेत स्वच्छता करावी तसेच अति पाऊसामुळे कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता लक्षात घेता बागेचे निरीक्षण करून प्रादुर्भाव आढळ्यास शेंड्याकडील भागावर १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| **चिकू** | **फलधारणा** | • चिकूवरील बुरशीजन्य रोगामुळे होणाऱ्या फळगळीच्या नियंत्रणासाठी करण्यात येणारी १ टक्का बोर्डोमिश्रणाची तिसरी फवारणी करावी.<br>• चिकूच्या १ वर्षाच्या प्रती कलमास ५ किलो शेणखत, १५० ग्रॅम युरिया, ४५० ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि १५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश खतांचा पहिला हप्ता कलमाच्या विस्ताराच्या थोडीशी आत बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. पहिल्या वर्षी दिलेल्या खताच्या मात्रेच्या दुसऱ्या वर्षी दुप्पट , तिसऱ्या वर्षी तिप्पट या प्रमाणे वाढवून २० वर्षा पर्यंत २० पात खताचा हप्ता द्यावा. २० वर्षानंतर प्रती कलमास १०० किलो शेणखत, ३ किलो युरिया, ९ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३ किलो म्युरेट ऑफ पोटश खतांचा पहिला हप्ता देण्यात यावा. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**